# भारतीय ज्ञान आणि महिला सक्षमीकरण

**प्रज्ञा परिजन दुधे**
पीएच.डी. संशोधक, स्नातकोत्तर मराठी विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश**

भारतीय ज्ञानाचा संबंध हा प्राचीन काळापासून अनेक क्षेत्रामध्ये दिसून येतो. विविध प्रकारच्या, प्रगतीशी अव्दितीय अशी परंपरा भारतीय ज्ञानाला लाभलेली आहे. भारतीय विचारविश्वाचा भक्कम असा पाया या 'ज्ञान' संकल्पनेवर आधारलेला आहे. अगदी सुरुवातीच्या काळाचा विचार केला तर वेद, उपनिषदे, आयुर्वेद, वास्तुशात्र व विज्ञान इत्यादी विषयांचा समावेश भारतीय ज्ञानासोबत जुडलेला आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगाला ज्ञान, तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा मौलिक वारसा देणारी आहे. या ज्ञानपरंपरेत स्त्रीचे देखील महत्वपूर्ण स्थान राहिलेले आहे. यात स्त्रीच्या बौद्धिक, सामाजिक, आध्यात्मिक अशा सर्व घटकांचा समावेश होत असतो. यामध्ये भारतीय संस्कृती आणि त्या अनुषंगाने त्यांची जीवनशैली यांचा अभ्यास करण्यासाठी या ज्ञान परंपरेचा महत्वाची भूमिका राहिलेली आहे. आधुनिक काळामध्ये 'महिला सक्षमीकरण' या संकल्पनेला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. समाजात वावरताना स्त्रीयांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, राजकीय न्याय व हक्क मिळावे या मुख्यतः उद्देश.

**बीजशब्द** : भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व, महिला सक्षमीकरण, महिला सक्षमीकरणातील विशेष बाबी, जागतिक महिला परिषदा

## प्रस्तावना

भारतीय ज्ञान परंपरा ही अतिशय व्यापक आणि बहुआयामी स्वरूपाची आहे. या ज्ञान प्रणालीचा शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यत्मिक विकासाकरिता उपयोग होत असतो. भारतीय ज्ञानपरंपरेत स्त्रीच्या स्थानाबद्दल अतिसूक्ष्म आणि मौलिक स्वरूपाचे विचार आहेत किंबहुना सांस्कृतिक जडणघडणीत महिलांचा सहभाग किती अनिवार्य व महत्वाचा असतो हे देखील तितकेच महत्वाचे आहे. आजच्या आधुनिक काळात 'महिला सक्षमीकरण' हा समाजाच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू असला तरी सुद्धा त्याचे मूळ प्राचीन ज्ञान परंपरेशी जुळलेले आहे. प्राचीन काळाचा विचार केल्यास तेव्हापासून आताच्या आधुनिक काळापर्यंत भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनात जे बदल झाले त्याचा परिणाम स्त्री जीवनावर झालेला आहे. यातील काही बंधने जाचक होती, काही स्वीकार्य तर काही अस्वीकार्य स्वरुपाची होती. त्यामुळे आदर्श आणि वास्तव अशा प्रकारची तफावत स्त्री जीवनावर पडलेली दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय ज्ञान आणि महिला सक्षमीकरण या संशोधन लेखाची मांडणी करण्यात येत आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधात आशय विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम स्वरूपाच्या माहितीकरिता पुस्तके, विकिपीडिया, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात आलेला आहे.

## भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व :

भारतीय ज्ञान प्रणाली ही व्यापक स्वरुपाची आहे. प्राचीन आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून भारतीय ज्ञान प्रणालीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रकारे जीवनाचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करण्यासाठी शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक प्रगतीकरिता ही ज्ञान प्रणाली मार्गदर्शक ठरते. भारतीय ज्ञानाबद्दल अल्बर्ट आईनस्टाईनचे मत, "आपण प्राचीन भारतीयांचे खूप ऋणी आहोत, ज्यांनी आपल्याला मोजणी कशी करायची हे शिकविले. ज्याशिवाय बहुतेक आधुनिक वैज्ञानिक शोध अशक्य झाले असते."[१] यावरून भारतीय संस्कृतीने ज्ञानाला महत्व दिलेले आहे हे दिसून येते. ज्ञान प्रणालीने केवळ भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला ज्ञान, तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा मौल्यवान ठेवा दिलेला आहे. एकूणच भारतीय संस्कृतीचा व जीवनशैलीचा मूळ गाभा समजून घेण्याकरिता या ज्ञान प्रणालीचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. या प्रणालीला हजारो वर्षाचा प्रगल्भ इतिहास लाभलेला आहे. हा या ज्ञान प्रणालीचे महत्व खालीलप्रमाणे आहे.

### १)आध्यात्मिकता आणि तत्वज्ञान

या भारतीय ज्ञान प्रणालीला मानवी जीवनाचे अंतिम ध्येय, आत्मज्ञान आणि मोक्ष मानण्यात आले कारण उपनिषद, भगवतगीता, वेद आणि इतर तत्वज्ञानाची शिकवण याद्वारेच मिळत असते. मानवी जीवनातील गहन अशा प्रश्नावर विचार करण्यास सक्षम बनविते. मानवी जन्माच्या, जीवनाच्या उद्दिष्टांचा शोध घेण्यास ही भारतीय ज्ञान प्रणाली नेहमी प्रोत्साहित करीत असते.

### २)योग आणि आयुर्वेदातून आरोग्य

योग आणि आयुर्वेद हे या भारतीय ज्ञान प्रणालीतील महत्वाचे घटक आहेत, यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला महत्व देण्यात आले आहे. नियमितपणे योग केल्याने मानवी मन, शरीर आणि आत्मा यांचा समतोल साधता येतो त्याचप्रकारे आयुर्वेदाच्या माध्यमातून योग्य उपचार करणे ही एक शाश्वत आरोग्य प्रणाली आहे.

**३)शाश्वतता आणि निसर्गाशी संतुलन**

भारतीय तत्वज्ञानाने निसर्गाशी संतुलन राखण्यावर विशेष भर दिला आहे. निसर्गासोबत समतोल ठेवत जीवन जगणे आवश्यक आहे अन्यथा त्याचे भयंकर वाईट परिणाम या पृथ्वीतलावर येईल हे भाकीत ओळखून निसर्गाशी समरस होणे गरजेचे आहे. आजच्या आधुनिक काळात अनेक पर्यावरणीय समस्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे निसर्गाचे महत्व आणि त्याबरोबर जगण्याचे तत्वज्ञान या ज्ञान प्रणालीने दिलेले आहे.

**४)नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी**

या भारतीय ज्ञान प्रणालीने सदैव नैतिकता, धर्म, कर्तव्य आणि समाजात वावरताना सामाजिक जबाबदाऱ्यांना महत्व दिले आहे. त्याकरिता रामायण, महाभारत, धर्मशास्त्रे आणि नीतीग्रंथामधील शिकवण देणारे आहेत. आजच्या काळात समाजामध्ये नीतिमत्ता शिकवण्यासाठी सोबतच आचरण्यासाठी नैतिकतेची खऱ्या अर्थाने गरज आहे आणि ही गरज या ग्रंथाच्या मार्गदर्शनातून होत असते.

**५)वैज्ञानिक आणि गणितीय योगदान**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये वैज्ञानिक तर्काधिष्टीत ज्ञानाला महत्वाचे मानण्यात आले आहे. तसेच गणित, खगोलशात्र आणि विज्ञान यासारख्या विषयांनी जागतिक विज्ञानाच्या क्षेत्रात आपले भरीव असे योगदान दिले आहे. महत्वाच्या शोधात शून्याचा शोध, दशमलव पद्धती आणि अवकाशातील अभ्यास क्षेत्रामध्ये खगोलशास्त्रातील गहन स्वरूपातील संशोधन भारतीय विद्वानांनी केलेले आहे. संयुक्त राष्ट्रांनी या पारंपारिक ज्ञानाची व्याख्या याप्रमाणे केली आहे की, लॉरा नाडर यांच्या दृष्टीकोनातून ज्ञान प्रणालीच्या अभ्यासाच्या उद्देशाचे वर्णन करताना, "मुद्दा म्हणजे लोकांचे मन पाहण्याच्या आणि प्रश्न विचारण्याच्या इतर पद्धतीसाठी खुले करणे, ज्ञानाच्या दृष्टीकोनात बदल करणे, विज्ञानाच्या संघटनेची पुनर्रचना करणे या परंपराबद्दल जागतिक स्तरावर विचार करण्याची पद्धत तयार करणे."[२] असे म्हटलेले आहे. त्यामुळे भारतीय ज्ञान प्रणाली आजही वैज्ञानिक प्रगतीला आधार देणारी आहे यातूनच नवनवे शोध लागलेले आहेत.

**६)शिक्षण प्रणाली**

भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन काळापासून विकसित राहिलेली आहे. प्राचीन काळातील विद्यापीठे आणि आश्रम प्रणालीने आपल्या विविधांगी वैशिष्ट्यांनी भारताबाहेरील देशांना आकर्षित केलेलं आहे. मुळात आधीपासूनच शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा भारतीय वसा अनेक देशांनी सुद्धा स्वीकारलेला आहे. त्या काळात नालंदा, तक्षशीला यांसारख्या प्राचीन विश्वविद्यालयांनी शास्त्र, तत्वज्ञान, विज्ञान आणि कलेच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण असे शिक्षण दिले. या विश्वविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता प्रवेशपूर्व परीक्षा असायची त्या परीक्षेत यश मिळाल्यानंतर त्यांना प्रवेश मिळायचा आणि समोरील शिक्षण प्रक्रिया सुरु होत असे. विध्यार्थांची क्षमता ओळखून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करून विशेष मार्गदर्शनाखाली निगराणीखाली ठेवण्यात येत असे. आजच्या काळातही या ज्ञान प्रणालीचे तत्वज्ञान समोरील पिढीकरिता अतिशय उपयुक्त ठरणारे आहे.

**७)सांस्कृतिक आणि कलात्मक महत्व**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये पंचकलेचे देखील स्थान आहे. त्यात नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, चित्रकला, संगीत आणि नृत्य यांना महत्व देण्यात आले आहे. या पंचकलेच्या माध्यमातून भारतीय कला आणि संस्कृतीतून मानवी भावभावनांचे आणि तत्वज्ञानाचे दर्शन उत्तम प्रकारे होते, एकप्रकारे संपूर्ण मानवी जीवन समृद्ध करण्याकरिता या कलांना विशेष महत्व देण्यात आले आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीतील स्त्रीचे स्थान :**

**१)वैदिक काळातील स्त्री**

वेद काळामध्ये स्त्रियांमध्ये गार्गी, मैत्रेयी यांना महत्वपूर्ण स्थान होते. तसेच उपनिषदांमध्ये ज्ञान शोधाकरिता सक्रीय सहभाग नोंदविण्यात आलेला होता. तरीसुद्धा वैदिक काळात पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीवर विशेष भर दिसून येतो.

**२)बौद्ध काळातील स्त्री**

सर्वप्रथम भ. बुद्धांनी स्त्रीयांना संघात प्रवेश दिला आणि स्त्री-पुरुष समानता विषयक पहिली मुहूर्तमेढ रोवली. बुद्धकाळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा उंचावलेला होता. समाजातील वेगवेगळ्या सांस्कृतिक, आर्थिक स्तरातील स्त्रिया बुद्धाच्या विचाराने प्रेरित होऊन संघात प्रविष्ठ झाल्या होत्या. समाजाला नवसमाज निर्मितीसाठी

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

बुद्धांचा धम्म दिशादर्शक स्वरूपाचा आहे हे सर्वार्थाने पटले. थेरीगाथेपासून आधुनिक काळातील स्त्रीयांना बरेच शिकण्यासारखे आहे. महाप्रजापती, धम्मदीन्न, खेमा आणि उप्पलवणा या साध्वता आणि चारित्र्याचे आदर्श रूप होत्या.

**३)जैन काळातील स्त्री**

जैन धर्मानुसार स्त्री ही धर्माच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे तसेच श्वेतांबर पंथात स्त्रीयांना ज्ञानप्राप्ती करण्याकरिता मान्यता आहे.

एकंदरीत अशाप्रकारे भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व अनन्यसाधारण आहे यात सर्वसमावेशकतेत, शाश्वततेत आणि जीवनाच्या महत्त्वपूर्ण पैलूंवर विचार करणाऱ्या तत्त्वज्ञानात आहे. ज्ञानाची ही परंपरा फक्त प्राचीन काळालाच अनुरूप आहे असे नाही तर आधुनिक काळातही या भारतीय ज्ञान प्रणालीला तितकेच महत्वाचे स्थान आहे, किंबहुना या प्रणालीचे मार्गदर्शन नंतरच्या काळातही इतकेच महत्वाचे असणार आहे.

**महिला सक्षमीकरण :**

भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केल्यास अनेक प्रकारचे बदल दिसून येतात. वर्णाश्रम पद्धतीमुळे काही समाजघटकांना आणि मुख्यतः स्त्रीयांना गुलामगिरीत ठेवण्यात आले होते; त्यांना म्हणजेच वंचिताना मानवी हक्क आणि अधिकार मिळवून देण्याची प्रक्रिया म्हणजेच सक्षमीकरण करणे होय. भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक व्यवस्थेने देखील स्त्रियांच्या प्रगतीला वाव दिलेला नाही. आधुनिक काळातही त्याचे स्वरूप जरी बदलले तरीसुद्धा आजही स्त्रीयांचे शोषण होताना दिसून येते. आधुनिक काळात सबलीकरणाच्या माध्यमातून स्त्रियांचा दर्जा ठरविण्यात येत आहे. १९९० मध्ये महिलांचे हक्क आणि नियम याकरिता महिला आयोगाची निर्मिती करण्यात आली. नंतर १९९३ मध्ये भारतीय संविधानातील कायद्यात कलम ७३ व ७४ मध्येही सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणांनुसार पंचायत समिती आणि नगरपालिकामध्ये काही जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. यानुसार महिलांना स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यामध्ये सहभाग देण्यात आला. वैदिक काळाचा विचार केल्यास काही प्रमाणात अधिकार होते त्यातील उच्च कुळातील स्त्रीयांना धर्मग्रंथ आणि पुराणे वाचण्याचा उल्लेख आहे. परंतु नंतरच्या काळात म्हणजे मध्ययुगीन काळात मात्र समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण याचे स्वरूप बदललेले दिसून येते. शिवाजी राजांच्या काळात, पेशव्यांच्या काळातही आणि नंतरही रामायण, महाभारत काळातही फारसे स्त्री विषयक समाधानकारक चित्र दिसून येत नाही. १९ व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी स्त्री-सुधारणेकरिता प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात स्त्रियांची प्रगती झाली तरी देखील प्रश्न अजूनही होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले, कायद्याने स्त्री-पुरुष समानता दिली पण कायद्याने जरी समानता दिली तरी प्रत्यक्षात भारतीय स्त्रीयांना पूर्णपणे अधिकार मिळालेले नाही. वास्तवात वावरताना स्त्री आहे म्हणून कमी वेतन, कौशल्याचा उणेपणा, उत्पादनाच्या जगात कमी वाव, साक्षरतेचे प्रमाण कमी, कुपोषण, कौटुंबिक हिंसेचे प्रमाण, हुंडाबळी, बलात्कार, यांसारखे अनेक अत्याचाराचे व शोषणाचे प्रकार दिसून येतात.

जागतिक पातळीवर पुरुषांच्या तुलनेत महिलांची संख्या जवळपास अर्धी आहे. (४८.०९ आहे, काही भागात ती कमी देखील झालेली आहे), त्या दिवसभरातील दोन तृतीयांश वेळ काम करत असतात. जगाच्या १०% उत्पन्नामध्ये त्यांचाही वाटा आहे मात्र या मालमत्तेमध्ये त्यांचा हिस्सा एक शंभरापेक्षा देखील (१/१००) कमी आहे. आज मात्र स्त्रियांची सामाजिक भूमिका वाढत आहे कारण त्याकरिता महिलांनी स्वतःला सिद्ध केले आहे. आधी मात्र फक्त पुरुषांनाच समजले जात होते.

महिला सक्षमीकरण ही संकल्पना आज देशव्यापी पातळीवर महत्वाची समजली जाते. स्त्रीयांना सुद्धा त्यांचा सहभाग किती महत्वाचा आहे हे कळलेलं आहे. नवव्या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून महिलांचा विकास व सोबतच महिला कल्याणाकरिता त्यांचे आरोग्य, आहार, शिक्षण व रोजगार, प्रशिक्षण याकडे विशेष लक्ष्य दिले गेले. सबलीकरण किंवा सक्षमीकरण या शब्दाचा अर्थ एखाद्याला सामर्थ्यवान करणे किंवा असमतोलाच्या बाबतीत स्वतः निर्णय घेऊन शिक्षण, सहभाग, आर्थिक स्वातंत्र्य, गतिमानता, सार्वजनिक ठिकाणी भाष्य करणे, हक्कांबद्दल जागरूकता आणि अमलबजावणी व राजकीय सहभाग इत्यादी. याचा अर्थ ज्याला कधीही संधी देण्यात आली नाही त्यांना प्रवाहात आणण्याकरिता योग्य आणि अयोग्य यातील फरक शिक्षणाच्या माध्यमातून समजावून देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधने. महिला सबलीकरण ही केवळ सत्तेचे वाटप, पुनर्वाटप किंवा त्यांचा सहभाग यापुरताच मर्यादित नसतो तर सामाजिक, आर्थिक आणि संस्थात्मक व्यवस्थेतील बदलही अपेक्षित आहे.

सबलीकरण किंवा सक्षमीकरण ही बहुविध आणि बहुआयामी संकल्पना आहे. या संकल्पनेत सत्ता मिळविण्यासाठी न्यायाचे वाटप योग्यपणे होणे अपेक्षित असते; मात्र त्याकरिता समाजातील सत्ता व अधिकार

यांची विल्हेवाट लावत असताना समाजरचनेची श्रेणी समजून घेणे आवश्यक असते. या दृष्टीकोनातून विचार केल्यास भारतीय समाजात स्त्रीला मिळालेला दर्जा, सामाजिक व आर्थिक स्थितीतील स्थान यांचा विचार करावा लागतो. या विचाराअंतर्गत महिला सक्षमीकरणात महिलांना कोणत्याही विशिष्ट श्रेणीमध्ये न विभागता त्यांचा सर्वसमावेशक विकासातून देशाचा सर्वकष साधला जावू शकतो.

**महिला सक्षमीकरणातील विशेष बाबी :**

**१.स्वावलंबी**

महिला सक्षमीकरण हे मुख्यतः सामाजिक न्याय आणि समानता यांनी जोडलेले आहे त्यामुळे सामाजिकदृष्ट्या महिलांना समान वागणूक मिळणे ही सक्षमीकरणाची खरी गरज आहे. याप्रकारच्या वागणुकीमुळे स्त्रीयांना राजकारणामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेऊन आर्थिक दृष्ट्या उत्पादक घटक म्हणून काम करता येईल आणि अर्थ मिळाल्यामुळे स्वतः स्वावलंबी होता येईल.

**२.सक्रियता**

महिलांना स्वतःची वेगळी ओळख प्राप्त करून देण्यासाठी सक्षमीकरण ही सक्रीय अशी प्रक्रिया आहे जेणेकडून महत्वाच्या क्षेत्रात स्त्रीयांना स्थान मिळेल व कर्तुत्वाने यशाची उंची गाठता येईल. नेहमीच अशा कर्तुत्ववान सक्षम महिलांची सकारात्मक स्वप्रतिमा समाजासोर निर्माण होते आणि पर्यायी स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या विकासात निर्णय घेण्यात सक्रियपणे सहभाग नोंदविता येते.

**३.नियंत्रण**

सक्षमीकरण प्रक्रियेत नियंत्रणावर भर देण्यात आला आहे कारण महिलांना संसाधनावर मोठ्या प्रमाणात अधिक चांगल्याप्रकारे नियंत्रण ठेवता येते. यात घराविषयी, समाजाविषयी, देशाविषयी आणि जगाविषयी प्रसंगावधान राखून योग्य निर्णय घ्यावा लागतो त्याकरिता नियंत्रण ही महिला सक्षमीकरणात अतिशय महत्वाची बाब आहे.

**४.ज्ञान व संसाधने**

सक्षमीकरण ही बहुआयामी प्रक्रिया असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील महिलांना त्यांची ओळख आणि सामर्थ्याची समर्थपणे जाणीव करून देणारी आहे. तसेच घर, समुदाय, समाज व राष्ट्र यांच्या हितासंबंधीचे ज्ञान आणि संसाधने व निर्णयप्रक्रिया यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महिलांना प्रत्यक्षरीत्या सहभागी करून घेतले जाते आणि सक्षमीकरणाची प्रक्रियेत स्त्रीयांना त्यांचे हक्क प्रधान केले जाते.

**सक्षमीकरणाचे मार्ग / साधने :**

१.शिक्षण
२.आरोग्य व आहार
३.आर्थिक स्वातंत्र्य
४.कायदेविषयक जागरूकता
५.विविध संस्थांचे साह्य
६.इंटरव्हेन्शन प्रोग्राम्स

महिला सक्षमीकरण आणि विविध क्षेत्र यांच्यात घनिष्ट संबंध आहे कारण या संबंधांमुळे महिलांना सर्व क्षेत्रात संधी मिळत असते. अशी महत्वपूर्ण क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत : शिक्षण, आरोग्य, आर्थिक आणि राजकीय सहभाग इत्यादी. या क्षेत्राच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी सरकारने देखील विविध प्रकारचे कायदे व सुव्यवस्था निर्माण केल्या आहेत. या धोरणांच्या द्वारे सरकार वेळोवेळी विविध उपक्रम व योजना आखत असतो आणि त्या अमलातही आणल्या जातात. याप्रकारे विकास नियोजन ह्यासारख्या महत्वाच्या प्रक्रियेत देखील त्यांना समाविष्ट करून घेतले जात असते.

अशाप्रकारे महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांचे अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक सामर्थ्य वाढवून त्यांच्यात योग्य त्या क्षमतांचा विकास करून आत्मविश्वास निर्माण करणे हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे. या सक्षमीकरणामध्ये खालील काही घटकांचा समावेश होतो.

- स्वतः निर्णय घेण्याचे सामर्थ्य
- योग्य निर्णय घेण्यासाठी माहिती व इतर साधने उपलब्ध असणे
- निवड करण्यासाठी विस्तृत पर्याय असणे
- सामुहिक निर्णय घेताना दृढ निर्णय घेण्याची योग्यता
- परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचारसरणी
- वैयक्तिक किंवा सामूहिक सामर्थ्यामध्ये सुधारणा घडवण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची योग्यता

- लोकशाही पद्धतीने इतरांचे दृष्टीकोन बदलण्याची क्षमता
- अखंड व स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया व परिवर्तनात सहभाग घेणे
- स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे व नकारात्मक गोष्टींवर ताबा मिळविणे

अशाप्रकारे महिला सक्षमीकरण करताना या घटकांच्या सहाय्याने करता येईल तसेच प्रत्येक योजना व उपक्रमातील बारकाव्याने सक्षमीकरणाचे ध्येय गाठण्यास मदत होईल.

**महिला सक्षमीकरणाची व्याख्या :**

महिला सक्षमीकरण म्हणजे काय हे व्याखेच्या अभ्यासातून अधिक चांगल्याप्रकारे समजावून घेता येईल.

१)युनेस्कोच्या व्याख्येनुसार "स्त्री सक्षमीकरण म्हणजे सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या स्त्रियांची स्वतःच्या संदर्भात तसेच समाजातील इतर घटकांच्या संदर्भात निर्णय घेण्याची क्षमता होय." म्हणजेच स्त्रियांच्या संदर्भात स्वतःच्या क्षमता ओळखण्यासाठी, त्यांचा कुशल पद्धतीने वापर करण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे म्हणजेच स्त्री सक्षमीकरण होय.

२)"महिलांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीकरिता समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय."

३) Word Bank अनुसार, "व्यक्तिला किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फल प्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय."

यावरून थोडक्यात आजच्या युगात परिवर्तन सातत्याने सुरु आहे त्यामुळे या परिवर्तनात महिलांचा सुद्धा वाटा तितकाच महत्वाचा आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना सशक्त बनविणे आहे. हा परिवर्तनाचा सकारात्मक बदल समाज घडविण्याकरिता आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध प्रकारच्या स्त्री समस्यांचा शोध घेण्यात आलेला आहे. त्यातच आंतरराष्ट्रीय महिला दशकाच्या (१९७५-१९८५) निमित्ताने जगभरातील स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध घेण्यात आलेला आहे. सर्वप्रथम सक्षमीकरण होण्याकरिता प्रत्येक देशातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा शोध घेणे आवश्यक आहे याकरिता युनोने लक्ष्य वेधलेले आहे. या शोधात असे आढळून आले की, जगभरातील स्त्रिया उत्तर आधुनिक जगातही विवशतेने जीवन जगत आहेत हे भयानक वास्तव समोर आलेले आहे. या वास्तवातील स्त्री प्रश्नांच्या शोधाकरिता संयुक्त राष्ट्राने जागतिक परिषदांचे आयोजन केलेले आहे. महिला सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत जागतिक महिला परिषदेला महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे.

**जागतिक महिला परिषदा :**

**१)मेक्सिको परिषद – (१९७५)**

आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त सर्वप्रथम मेक्सिको याठिकाणी पहिली जागतिक महिला परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये १३३ शासन महिला प्रतिनिधींनी भाग घेतला होता. या परिषदेत महिला विकासाच्या दृष्टीकोनातून 'जागतिक कृती योजना (World Plan Action)' निश्चित करण्यात आले. तसेच यात पुढील दशकापर्यंत म्हणजेच १९८५ पर्यंत समता, शांतता आणि विकास यासंदर्भात तीन उद्दिष्टे नमूद करण्यात आली. ती खालीलप्रमाणे आहेत-

१) लिंगभाव विषमतेचे उच्चाटन करून पूर्णपणे लिंगभाव समानता निर्माण करणे.
२) विकास आणि एकात्मीकरणात महिलांचा संपूर्ण सहभाग वाढवणे.
३) जागतिक शांतता बांधणीत महिलांचे योगदान वाढवणे.

या परिषदेचा परिणाम म्हणून महिलांच्या प्रगतीकरिता आंतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (INSTRAW) आणि संयुक्त राष्ट्रांचा महिलांकरिता विकासनिधी (UNIFEM) या संस्था स्थापन झाल्या.

**२)कोपेनहेगन परिषद – (१९८०)**

महिला सक्षमीकरणाकरिता कोपेनहेगन याठिकाणी दुसरी जागतिक महिला परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत १४५ राष्ट्रांचे प्रतिनिधीनी सहभाग घेतलेला होता. या परिषदेमध्ये महिलांना कायदेशीर हक्क आणि या हक्कांची अमलबजावणी करण्याची महिलांची सक्षमता यामधील तफावतीवर चर्चा झाली. यासंदर्भात काही घटक ठरविण्यात आले ते खालीलप्रमाणे आहेत.

१. समाजातील महिलांची भूमिका सुधारण्यातील पुरुषांच्या पुरेशा सहभागाचा अभाव.
२. अपुरी राजकीय इच्छाशक्ती.
३. समाज टिकविण्यात महिलांचे योगदान महत्वाचे असते. या मुद्याला मान्यता देण्याचा अभाव.
४. नियोजनामध्ये महिलांच्या विशेष गरजांकडे दुर्लक्ष.

५. निर्णय-निर्धारण स्तरावर महिलांची कमतरता.
६. महिलांना अत्यावश्यक वित्तीय संसाधनांचा
७. उपलब्ध असलेल्या संधीबाबत महिलांमध्ये असलेला जाणीव-जागृतीचा अभाव.

या परिषदेत मुख्यतः महिलांचे हमीकृत हक्क आणि त्यांना अमलात आणण्याची त्यांची क्षमता यात तफावत आहे, असे निदर्शनास आले. तसेच या परिषदेत समानता, विकास आणि शांततेकरिता एकूण तीन क्षेत्रात काम करणे आवश्यक आहे असे मानले गेले. ती तीन क्षेत्रे म्हणजे, शिक्षणात समान संधी, रोजगार संधीबाबत समान पोच आणि पुरेशा आरोग्य सेवा सुविधा ही आहेत. ह्याप्रकारे सक्षमीकरण कण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

**३)नैरोबी परिषद – (१९९०)**

या परिषदेत १५७ देशांमधून १४०० औपचारिक शिष्टमंडळे उपस्थित होती. स्त्री समर्थनार्थ महिला सबलीकरणाची संकल्पना या परिषदेत उदयास आली. त्यानुसार सबलीकरणाचा अर्थ म्हणजे सामाजिक सत्ता किंवा अधिकार व संसाधनांवरील नियंत्रण यांचे हक्क स्त्रीयांना मिळवून देणे होय.

सबलीकरणात खालील घटकांचा समावेश होतो.

१. समाजामधील संसाधनांचा उपयोग करण्याकरिता महिलांना समान संधी.
२. हिंसाचारापासून मुक्ती.
३. विचार व प्रत्यक्ष कृती करताना लिंगभेदभाव न करणे.
४. आर्थिक स्वातंत्र्य
५. सर्व महत्वाच्या निर्णय क्षेत्रात महिलांना सहभागी करून घेणे.
६. जीवनाशी सबंधित बाबींच्या निवडीकरिता पूर्ण स्वातंत्र्य.

याप्रकारे या परिषदेत सुधारणा करण्यात आल्या परंतु याचा लाभ मात्र काहीच महिलांना झाला त्यामुळे नैरोबी परिषदेमध्ये नमूद करण्यात आले की, लिंगभाव समानता हा स्वतंत्र असा विषय नसून टो सर्व मानव कृतीच्या क्षेत्राने व्यापलेला विषय आहे. महिलांच्या प्रगतीकरिता केवळ लिंगभावाशी सबंधितच नाही, तर सर्वच क्षेत्रामध्ये सहभागी होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे महिला दशकाची उद्दिष्ट्ये (स्वातंत्र्य, विकास, शांतता) साध्य करण्यासाठी व अडथळ्यावर मात करण्यासाठी नवीन मार्ग शोधण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

**४)बीजिंग परिषद – (१९९५)**

महिला सक्षमीकरणासाठी चौथी परिषद चीन येथील बीजिंगमध्ये पार पडली. ही परिषद 'लिंगभाव समता' याबाबतची जागतिक विषयपत्रिका स्थापन करण्यात महत्वाची ठरली आहे. या परिषदेत १८९ राष्ट्रांनी एकमताने बीजिंग घोषणापत्रे आणि कृतीकरिता व्यासपीठ (Platform for Action) स्वीकारले. या परिषदेत महिलांची प्रगती आणि लिंगभाव समता साध्य करण्यासाठी १२ महत्वपूर्ण विषय क्षेत्र अधोरेखित कण्यात आले.

१. महिला आणि दारिद्य.
२. महिलांचे शिक्षण आणि प्रशिक्षण.
३. महिला आणि आरोग्य.
४. महिलांविरोधी हिंसाचार.
५. महिला आणि सशस्त्र संघर्ष.
६. महिला आणि अर्थव्यवस्था.
७. सत्ता आणि निर्णय-निर्धारणातील स्त्रियांचा सहभाग.
८. महिलांच्या प्रगतीसाठी संस्थात्मक यंत्रणा.
९. महिलांचे मानवी हक्क.
१०. महिला आणि प्रसार माध्यमे.
११. महिला आणि पर्यावरण.
१२. स्त्री अपत्य (बालिका).

तसेच या महिला सक्षमीकरणाचे काही निदर्शक (Indicator) नमूद करण्यात आले, ती खालीलप्रमाणे आहेत.

१. स्व-प्रतिष्ठा, व्यक्तिगत आणि सामुदायिक आत्मविश्वास वाढविणे.
२. प्रजोत्पादन हक्क, आरोग्य, कायदा, साक्षरता याबाबत जागृती करणे.
३. कामाचा ताण कमी करणे.

४. कुटुंब आणि समुदायातील भूमिका आणि जबाबदारी बदलवणे.
५. महिलांवरील हिंसाचार कमी करणे.
६. बालविवाह, हुंडा पद्धती, विधवा महिलांवरील अत्याचार यासारख्या प्रथांचे निर्मुलन करणे.
७. महिलांची सौदेबाजीची, वाटाघाटींची सत्ता वाढवणे.

महिला सक्षमीकरणात या चार जागतिक परिषदेची महत्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. या परिषदे अंतर्गत सर्व स्तरावरील स्त्रियांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने व्यापक स्वरुपाची चर्चा करण्यात आली. या परिषदेमुळे संपूर्ण जगभरातील स्त्रियांचा स्वाभिमान जागृत झाला आणि स्वतःच्या अस्तित्वाविषयीचे भान आले. त्यामुळे स्त्रीयांना वास्तव जीवनात येणाऱ्या समस्या व त्या सोडविण्यासाठी करणारी तडजोड यासारख्या प्रश्नाची उत्तरे मिळाली.

**निष्कर्ष :**

१)भारतीय लोकसंखेच्या तुलनेत निम्यापेक्ष्या अधिक प्रमाणात असलेल्या महिलांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार मिळल्याशिवाय स्त्री सशक्तीकरण होणार नाही आणि परिणामतः विकासाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
२)भारतातील वर्णाश्रम पद्धतीमुळे पुरुषकेंद्री व्यवस्थेने स्त्रियांवर अमानवी प्रकारचे निर्बंध लादले त्यामुळे स्त्रियांच्या कार्यक्षेत्रावर मर्यादा आल्या आणि स्त्रीच्या विकासाची प्रक्रिया खुंटायला सुरुवात झाली.
३)सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांकरिता नवे क्षितीज उभे करून भारताची प्रगतीशील वाटचाल सुरु झालेली आहे.
४)स्त्री आणि पुरुष यांना निसर्गाने निर्माण केले, निसर्गतः कुठलाही भेद नसताना समाजात स्त्रीयांना गौण दर्जा देण्यात आला.
५)समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर स्त्री व पुरुष असा भेदभाव न करता समतोल जीवनाच्या घटकांवर लक्ष्य केंद्रित करणे आवश्यक आहे.
६)सुरुवातीला भ. बुद्धांनी, संतानी, समाजसुधारकांनी, स्त्री संघटनांनी, भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आणि जागतिक पातळीवरील महिला परिषदेनी विविध प्रकारे योजना आणि उपक्रम राबवून स्त्री प्रगती करिता विशेष प्रयत्न केलेले आहे.
७)महिला सक्षमीकरण यशस्वी होण्यासाठी समाजातील सर्व स्तरातून प्रयत्न सुरु असताना महिलांवरील अन्याय, अत्याचार याविषयीची गांभीर्याने दाखल घेणे आवश्यक आहे.
८)देशाचा शाश्वत विकास साधण्यासाठी महिलांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक सोबतच स्वातंत्र्य, कुटुंब आणि समाज यातील निर्णयात त्यांचा सहभाग त्यानुसार स्त्रियांच्या मताचा आग्रह एकूणच या सर्व बाबींमुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन व्यक्तिमत्वाच्या विकासात वृद्धी होईल.
९)मानवी जीवन हे गतिमान आहे, बदलत्या काळानुसार त्यात सतत बदल होत असतो यामुळे विकासाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरु होते त्या विकास प्रक्रियेला गतिमान करण्याची क्षमता स्त्रियांमध्ये आहे. या बदलातून सक्षम महिला समाज आणि राष्ट्राचा भक्कम पाया उभा करू शकतात.
१०)भारतीय ज्ञान प्रणालीचा मजबूत पाया आणि आधुनिक काळातील धोरण यांची योग्यरीत्या सांगड घालून महिला सक्षमीकरणाचा मार्ग अधिक सुसंगतपणे पार पाडता येईल.

**संदर्भग्रंथ सूची :**

१)डॉ. वैरागडे उज्वला, प्रा. मुळे विद्युलता – विद्या बुक्स पब्लिशर्स, सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, २०१८, दुसरी आवृत्ती, औरंगाबाद
२)डॉ. महाजन जयश्री – अथर्व पब्लिकेशन्स, महिला सक्षमीकरण, २०२३, धुळे
३)डॉ. पात्रे कृष्णा - IKS – शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
४)इंटरनेट वरील माहिती व लेख